SHIROLI MANUFACTURER'S ASSOCIATION, KOLHAPUR

SMAK
SHIROLI MANUFACTURERS ASSOCIATION, KOLHAPUR

Smak Bhavan, Plot No. P-59, MIDC Shiroli, Kolhapur - 416122. Off.Contact : 8530601616 smakkop@gmail.com www.smakkolhapur.org

21 नोव्हेंबर 2025

**सरकारने चारही लेबर कोड्स लागू केले - कामगार कायदे अधिक सोपे आणि सुलभ करण्यासाठी मोठे पाऊल.**

**चार लेबर कोड्समुळे आता कामगारांना उत्तम वेतन, सुरक्षितता, सामाजिक सुरक्षा आणि वाढीव कल्याण मिळणार आहे.**

**उद्योगांसाठीही नियम अधिक स्पष्ट, आधुनिक आणि सोपे होणार आहेत.**

**हे कोड्स आत्मनिर्भर भारत घडवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतील. हे कोड्स भारतातील कामगार व्यवस्थेला जागतिक मानकांशी सुसंगत करतात आणि सर्व कामगारांसाठी सामाजिक न्याय सुनिश्चित करतात.**

भारत सरकारने ऐतिहासिक निर्णय घेत चार लेबर कोड्स - **वेतन संहिता 2019**, **औद्योगिक संबंध संहिता 2020**, **सामाजिक सुरक्षा संहिता 2020**, **व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कार्यस्थिती संहिता 2020** हे सर्व 21 नोव्हेंबर 2025 पासून लागू करण्याची घोषणा केली आहे. यामुळे आधी असलेले 29 वेगवेगळे कामगार कायदे एकत्र आणून सुलभ करण्यात आले आहेत. या निर्णयामुळे कामगार कायदे अधिक आधुनिक झाले, कामगारांना मिळणाऱ्या सुविधा सुधारल्या आणि बदलत्या उद्योग व रोजगार क्षेत्राशी जुळवून घेणारी व्यवस्था निर्माण झाली आहे. यामुळे भविष्यातील कामगारांसाठी मजबूत पाया तयार होतो आणि उद्योग अधिक सक्षम व लवचिक बनतात.

भारतामध्ये अनेक कामगार कायदे 1930 ते 1950 या काळात, म्हणजे स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात तयार झाले होते. त्या वेळीची अर्थव्यवस्था आणि रोजगाराची परिस्थिती आजच्या काळापासून खूप वेगळी होती. जगातील अनेक देशांनी आपले कामगार कायदे मागील काही दशकांत सुधारले, पण भारतात अजूनही 29 तुकड्यात विभागलेले, गुंतागुंतीचे व काही ठिकाणी कालबाह्य झालेले कायदे अस्तित्वात होते. हे जुने कायदे आजच्या बदलत्या आर्थिक परिस्थितीशी आणि नवीन रोजगार प्रकारांशी जुळत नव्हते. यामुळे कामगार आणि उद्योग दोघांनाही अनिश्चितता आणि जास्त अनुपालनाचा [compliance] भार सहन करावा लागत होता.

नवीन लेबर कोड्समुळे ही अडचण दूर होऊन सोपे, स्पष्ट, पारदर्शक आणि भविष्याभिमुख कामगार कायदे लागू झाले आहेत. चारही लेबर कोड्सची अंमलबजावणी ही अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या गरजेची पूर्तता करते. जुन्या, वसाहतकालीन काळातील कामगार कायद्यांच्या चौकटीतून बाहेर पडून आता भारत आधुनिक आणि जागतिक स्तरावरील प्रवाहांशी सुसंगत अशी कामगार व्यवस्था उभारत आहे. हे कोड्स कामगार आणि उद्योग दोघांनाही सक्षम करतात. यामुळे कामगार अधिक सुरक्षित, उत्पादक आणि बदलत्या रोजगार व्यवस्थेशी जुळणारे बनतात, तर उद्योग अधिक मजबूत, स्पर्धात्मक आणि आत्मनिर्भर होतात.

लेबर कोड्स लागू होण्यापूर्वी आणि नंतरची कामगार व्यवस्थेची तुलना पुढीलप्रमाणे आहे -

| | **लेबर सुधारणा लागू होण्यापूर्वी** | **लेबर सुधारणा लागू झाल्यानंतर** |
|---|---|---|
| **रोजगाराचे औपचारिकीकरण** | नियुक्ती पत्र देणे अनिवार्य नव्हते. | सर्व कामगारांना अनिवार्यपणे नियुक्तीपत्र देणे बंधनकारक. लिखित पुरावा मिळाल्यामुळे पारदर्शकता, नोकरीची सुरक्षितता आणि निश्चित रोजगार सुनिश्चित होईल. |
| **सामाजिक सुरक्षा कवच** | सामाजिक सुरक्षा कवच मर्यादित होते. | सामाजिक सुरक्षा संहिता 2020 अंतर्गत, सर्व कामगारांना गिग व प्लॅटफॉर्म कामगारांसह सामाजिक सुरक्षा कवच मिळणार. सर्व कामगारांना पीएफ, ESIC, विमा तसेच इतर सामाजिक सुरक्षा सुविधा उपलब्ध होतील. |

| | | |
|---|---|---|
| **किमान वेतन** | किमान वेतन फक्त निर्धारित उद्योग / व्यवसायांवर लागू होत होते. त्यामुळे मोठा कामगार वर्ग किमान वेतनाच्या संरक्षणापासून वंचित राहायचा. | वेतन संहिता 2019 अंतर्गत, सर्व कामगारांना कायद्याने निश्चित किमान वेतन मिळण्याचा हक्क मिळाला आहे. किमान वेतन आणि वेळेवर वेतन मिळाल्यामुळे कामगारांची आर्थिक सुरक्षितता वाढेल. |
| **प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा** | नियोक्त्यांवर कामगारांना मोफत वार्षिक आरोग्य तपासणी देण्याची कोणतीही कायदेशीर बंधनकारक तरतूद नव्हती. | ४० वर्षांवरील सर्व कामगारांना नियोक्त्याने दरवर्षी मोफत वार्षिक आरोग्य तपासणी देणे अनिवार्य आहे. यामुळे वेळेवर आरोग्य तपासणी होऊन प्रतिबंधात्मक आरोग्याची संस्कृती मजबूत होईल. |
| **वेळेवर वेतन** | नियोक्त्यांकडून वेळेवर वेतन देण्याची कोणतीही कडक कायदेशीर सक्ती नव्हती. | नियोक्त्यांनी कामगारांना वेळेवर वेतन देणे अनिवार्य आहे. यामुळे कामगारांची आर्थिक स्थिरता, कामाचा तणाव कमी होणे आणि एकूणच मनोधैर्य वाढणे सुनिश्चित होईल. |
| **महिला कामगारांचा सहभाग** | महिलांच्या रात्रीच्या पाळीतील कामावर आणि काही विशिष्ट कामांवर मर्यादा होत्या. | महिलांना त्यांच्या संमतीने आणि आवश्यक सुरक्षा उपाययोजनांसह सर्व प्रकारच्या कामांमध्ये आणि रात्रीच्या पाळीत काम करण्याची परवानगी आहे. यामुळे महिलांना समान संधी, अधिक उच्च उत्पन्नाच्या नोकऱ्यांमध्ये प्रवेश आणि आर्थिक प्रगतीची संधी मिळेल. |
| **ESIC कवच** | ESICचे कवच फक्त सूचित क्षेत्रांपुरते आणि काही निश्चित उद्योगांपुरते मर्यादित होते. १० पेक्षा कमी कामगार असलेल्या युनिट्सना बहुतांश वेळा ESIC च्या कवचात समाविष्ट केले जात नव्हते. धोकादायक उत्पादन प्रक्रियेत [hazardous process] काम करणाऱ्या युनिट्ससाठी संपूर्ण भारतात एकसमान ESIC बंधनकारकता नव्हती. | ESIC चे कवच आणि त्याचे लाभ संपूर्ण देशभर [Pan-India] लागू केले गेले आहेत. १० पेक्षा कमी कामगार असलेल्या युनिट्ससाठी ESIC ऐच्छिक [voluntary] आहे. धोकादायक प्रक्रियेत एक जरी कामगार असला तरी त्या युनिटसाठी ESIC अनिवार्य आहे. यामुळे सर्व कामगारांना सामाजिक सुरक्षा व संरक्षण मोठ्या प्रमाणावर मिळणार आहे. |
| **अनुपालनाचा भार** | विविध कामगार कायद्यांनुसार अनेक नोंदणी, परवाने आणि रिटर्न्स भरावे लागत. | एकच नोंदणी, संपूर्ण भारतासाठी एकच परवाना आणि एकच रिटर्न - प्रक्रिया अधिक सोप्या, सुलभ, आणि अनुपालनाचा भार कमी. |

**महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये लेबर सुधारण्याचे फायदे** :

**■ निश्चित-मुदत कर्मचारी [Fixed-Term Employees - FTE]**

• FTE कामगारांना कायम कामगारांप्रमाणेच रजा, वैद्यकीय सुविधा आणि सामाजिक सुरक्षा यांसह सर्व लाभ मिळतील
• पूर्वी 5 वर्षांनी मिळणारी ग्रॅच्युइटी आता फक्त एक वर्ष सतत सेवा केल्यानंतर मिळणार.
• कायम कर्मचाऱ्यांप्रमाणेच समान वेतन, ज्यामुळे उत्पन्न वाढते आणि सुरक्षा मिळते.
• थेट भरतीला प्रोत्साहन मिळते आणि अवाजवी कॉन्ट्रॅक्ट बेस्ड रोजगार कमी होतो.

**■ कंत्राटी कामगार [Contract Workers]**

• फिक्स्ड-टर्म एम्प्लॉईज [FTE] मुळे रोजगाराच्या संधी वाढतील आणि कायम कामगारांप्रमाणेच सामाजिक सुरक्षा आणि कायदेशीर संरक्षण मिळेल.
• सलग एक वर्ष सेवा केल्यानंतर फिक्स्ड-टर्म कर्मचाऱ्यांना ग्रॅच्युइटीचा हक्क मिळेल.
• कंत्राटी कामगारांना आरोग्य सुविधा आणि सामाजिक सुरक्षा फायदे मूळ नियोक्त्याने [Principal Employer] द्यावे लागतील. सर्व कामगारांना मोफत वार्षिक आरोग्य तपासणी मिळेल.

**• कामगारांना दरवर्षी मोफत आरोग्य तपासणीची सुविधा दिली जाईल.**

**■ महिला कामगार [Women Workers]**

• लिंगभेद [Gender Discrimination] करणे कायदेशीरदृष्ट्या प्रतिबंधित आहे.
• समान कामासाठी समान वेतन देण्याची हमी.
• महिलांना त्यांच्या संमतीने रात्रीच्या शिफ्टमध्ये काम करण्याची परवानगी, तसेच सर्व प्रकारच्या कामात [ जसे की भूमिगत खाणकाम, हेवी मशिनरी ] काम करण्याची मुभा - आवश्यक सुरक्षा उपायांसह.
• तक्रार निवारण समित्यांमध्ये महिलांचे अनिवार्य प्रतिनिधित्व.
• महिला कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या व्याख्येत सासू-सासऱ्यांचा समावेश करण्याची तरतूद, ज्यामुळे त्यांच्या आश्रित कव्हरेज मध्ये वाढ होऊन अधिक समावेशकता सुनिश्चित होते.

■ **युवक कामगार [Youth Workers]**
• सर्व कामगारांना किमान वेतनाची हमी दिली जाते.
• सर्व कामगारांना नियुक्ती पत्र [ Appointment Letter ] देणे बंधनकारक - यामुळे सामाजिक सुरक्षा, रोजगाराचा पुरावा आणि औपचारिक नोकरीला प्रोत्साहन मिळेल.
• कामगारांचे शोषण रोखण्यासाठी - रजेच्या कालावधीतही वेतन देणे अनिवार्य केले आहे.
• कामगारांना सन्मान्य जीवनमान मिळावे यासाठी, त्यांना केंद्र सरकार निश्चित करील त्या फ्लोअर वेज [ किमान आधारभूत वेतन ] नुसार वेतन दिले जाईल.

■ **MSME क्षेत्रातील कामगार [ [MSME Workers]**
• MSME मधील सर्व कामगार सोशल सिक्युरिटी कोड 2020 अंतर्गत समाविष्ट - पात्रता कर्मचाऱ्यांच्या संख्येवर आधारित.
• सर्व कामगारांसाठी किमान वेतनाची हमी.
• कँटीन, पिण्याचे पाणी, विश्रांतीगृह इत्यादी मूलभूत सुविधांचा लाभ मिळणार.
• नियमानुसार कामाचे तास, ओव्हरटाईम साठी दुप्पट वेतन आणि सशुल्क रजा यांची तरतूद.
• वेळेवर वेतन मिळण्याची पूर्ण खात्री.

■ **धोकादायक उद्योगांतील कामगार [Hazardous Industry Workers]**
• सर्व कामगारांना दर वर्षी मोफत आरोग्य तपासणी मिळणार.
• कामगारांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकार राष्ट्रीय स्तरावरील सुरक्षा मानके तयार करणार.
• महिलांना सर्व प्रकारच्या ठिकाणी - भूमिगत खाणकाम, अवजड यंत्रसामग्री आणि धोकादायक कामांसह काम करण्याची परवानगी, ज्यामुळे समान रोजगार संधी सुनिश्चित होतील.
• प्रत्येक ठिकाणी सेफ्टी कमिटी अनिवार्य, ज्याद्वारे ठिकाणी सुरक्षा देखरेख आणि धोकादायक रासायनिक पदार्थांचे सुरक्षित हाताळणी सुनिश्चित केली जाईल.

■ **निर्यात क्षेत्रातील कामगार [Export Sector Workers]**
• निर्यात क्षेत्रातील फिक्स्ड-टर्म कामगारांना ग्रॅज्युइटी, भविष्य निर्वाह निधी [PF] आणि इतर सामाजिक सुरक्षा लाभ मिळणार.
• वर्षात १८० दिवसांची नोकरी पूर्ण केल्यानंतर प्रत्येक कामगाराला वार्षिक रजा घेण्याचा हक्क मिळेल.
• प्रत्येक कामगाराला वेळेवर वेतन मिळण्याचा अधिकार असेल, कोणत्याही प्रकारची अनधिकृत वेतन कपात किंवा वेतना वरील मर्यादा लागू राहणार नाही.
• महिलांना त्यांच्या संमतीने रात्रीच्या पाळीत काम करण्याची परवानगी - यामुळे महिलांना अधिक उत्पन्न मिळवण्याची संधी उपलब्ध.
• सुरक्षा व कल्याण उपाययोजना : लिखित संमती अनिवार्य, ओव्हरटाईम साठी दुप्पट वेतन, सुरक्षित वाहतूक व्यवस्था, सीसी टीव्ही देखरेख, आवश्यक सुरक्षा व्यवस्था सुनिश्चित करण्यात येणार

वरील प्रमुख कल्याणकारी उपायांव्यतिरिक्त, नवीन लेबर कोड्स आणखी अनेक सुधारणा घेऊन आले आहेत, ज्यामुळे कामगार संरक्षण अधिक मजबूत होते आणि नियोक्त्यांसाठी अनुपालन प्रक्रिया अधिक सुलभ आणि सोपी बनते.

• राष्ट्रीय फ्लोअर वेतन [National Floor Wage] - कोणत्याही कामगाराला किमान जीवनमानापेक्षा कमी वेतन मिळू नये याची खात्री.
• लिंग - निरपेक्ष वेतन व संधी - स्त्री, पुरुष तसेच ट्रान्सजेंडर व्यक्तींविरुद्ध कोणताही भेदभाव कठोरपणे प्रतिबंधित.
• इन्स्पेक्टर – कम - फॅसिलिटेटर प्रणाली - दंडात्मक कारवाई ऐवजी मार्गदर्शन, जनजागृती आणि अनुपालन सुलभ करण्यावर भर.
• त्वरित व पूर्वानुमानित वाद निराकरण - दोन सदस्यीय औद्योगिक अधिकरण [Industrial Tribunal] आणि समझोता प्रक्रियेनंतर थेट अधिकरणाकडे जाण्याची सुविधा.
• सिंगल नोंदणी, सिंगल लायसन्स आणि सिंगल रिटर्न - विविध कायद्यांतील अनेक नोंदण्या, परवानग्या व रिटर्न्स समाप्त, एकच एकत्रित प्रक्रिया.
• राष्ट्रीय OSH [Occupational Safety & Health] बोर्ड - सर्व क्षेत्रांसाठी एकसमान सुरक्षा आणि आरोग्य मानके तयार करणे.
• ५००+ कामगार असलेल्या आस्थापनांमध्ये सुरक्षा समित्या अनिवार्य - कार्यस्थळावरील उत्तरदायित्व आणि सुरक्षितता वाढविणे.

• फॅक्टरी लागूप्राप्ती मर्यादा वाढविणे - लहान उद्योगांवरील नियामक भार कमी करणे, परंतु कामगारांच्या सुरक्षा हक्कांचे संरक्षण कायम ठेवणे.

लेबर कोड्स तयार करण्याच्या प्रक्रियेदरम्यान जसे व्यापक सल्लामसलत करण्यात आले, त्याचप्रमाणे सरकार संबंधित नियम, विनियम, योजना इत्यादी तयार करताना जनतेशी व हितधारकांशी संवाद साधत राहील. संक्रमण काळात, विद्यमान विविध कामगार कायद्यांतील संबंधित तरतुदी, त्यांचे नियम, अधिसूचना, मानके, योजना इत्यादी लागूच राहतील.

गत दशकात भारताने सामाजिक सुरक्षा कवच मोठ्या प्रमाणात वाढवले आहे. २०१५ मध्ये जे कव्हरेज साधारणपणे फक्त १९% कामगारांपर्यंत मर्यादित होते, ते २०२५ मध्ये ६४% पेक्षा जास्त कामगारांपर्यंत पोहोचले आहे. यामुळे देशभरातील कामगारांपर्यंत संरक्षण आणि सन्मान पोहोचला असून सामाजिक सुरक्षेच्या या ऐतिहासिक यशाची जागतिक स्तरावरही दखल घेतली गेली आहे.

चारही लेबर कोड्सची अंमलबजावणी ही या प्रवासातील पुढची महत्त्वपूर्ण पायरी ठरली आहे. यामुळे सामाजिक सुरक्षा जाळे अधिक व्यापक झाले असून लाभांची पोर्टेबिलिटी [ राज्यांदरम्यान आणि विविध क्षेत्रांमध्ये लाभ हस्तांतर ] सुदृढ झाली आहे.

विस्तारित सामाजिक सुरक्षा, अधिक मजबूत संरक्षण आणि देशव्यापी लाभपात्रतेच्या पोर्टेबिलिटीमुळे हे कोड्स कामगारांना विशेषतः महिला, युवक, असंघटित, गिग आणि स्थलांतरित कामगारांना - कामगार प्रशासनाच्या केंद्रस्थानी ठेवतात. कंप्लायन्सचा बोजा कमी करून आणि आधुनिक, लवचिक कामपद्धती शक्य करून हे कोड्स रोजगारनिर्मिती, कौशल्यविकास आणि उद्योगवाढीस गती देतात.